**S.N.D.T. College of Arts and S.C.B. College of Commerce and Science for Women**

Workshop Report

***दोन दिवसीय कार्यशाळा***

***आयोजक : एस. एन. डि. टी. महाविद्यालय, मुंबई आणि विकास आयुक्त हस्तशिल्प कार्यालय पश्चिम क्षेत्र मुंबई.***

दि. ९ आणि १० मार्च रोजी एस. एन. डी. टी. महाविद्यालयात बी. व्हि. ए. चित्रकला विभागात विकास आयुक्त हस्तशिल्प कार्यालय पश्चिम क्षेत्र मुंबई यांच्या सहयोगाने प्रथम व द्वितीय वर्ष तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थिनी साठी हस्तकला कार्यशाळेचे आयोजन गिरगाव येथील कन्याशाळेत करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन हस्तकला विभागाचे सीनियर असिस्टंट डायरेक्टर श्री राजेंद्र सिंग आणि एस. एन. डी. टी. महाविद्यालय, चर्चगेट चे प्राचार्य डॉ. राजेंद्रजी गुरव यांच्या हस्ते करण्यात आले.

हस्तकला विभागाचे सीनियर असिस्टंट डायरेक्टर श्री. राजेंद्र सिंग, सीनियर अकाउंट ऑफिसर श्री. नामदेव हुले, असिस्टंट इंजिनियर श्री. आशिष तरडे यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्याची संधी आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींसाठी उपलब्ध झाली. दिनांक ९ रोजी मुलींना कुंभार कला म्हणजेच पोटरी मेकिंग तसेच दोराच्या सहाय्याने दागिने बनविण्याची कला शिकता येणार आहे. त्यासाठी हस्तकला विभागाचे श्री. मनजी चौहान आणि कुमारी अंजली कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच दिनांक १० रोजी ब्लॉक प्रिंटिंग आणि वारली कलेची ओळख होणार आहे ज्यासाठी श्रीमती विमल सावर्डेकर आणि श्री संदीप भोईर यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. या कार्यशाळेबरोबरच हस्तकला विभागातर्फे हस्तकलाकारांसाठी केंद्र सरकार तर्फे उपलब्ध विविध संधी, सुविधा आणि प्रकल्प यांची ओळख मुलींना होणार आहे.

या कार्यशाळेच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारत या संकल्पनेच्या सबलीकरणासाठी एस. एन. डी. टी. च्या विद्यार्थिनींचे पाऊल पुढे पडते ही अभिमानास्पद बाब आहे.

संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्रजी गुरव यांचे सहकार्य लाभले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सविता तायडे, डॉ. मीरा सावंत आणि प्राध्यापक दीपक जोगदंड यांच्या एकत्रित प्रयत्नातून कार्यक्रमाची आखणी करण्यात आली तसेच मुलींना मार्गदर्शन करण्यात आले.

दोन दिवसीय हस्तकलेच्या कार्यशाळेमध्ये मुलींनी भरघोस प्रतिसाद देऊन आपला सहभाग दर्शवला. ८० विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत उपस्थिती दर्शविली तसेच महाविद्यालयातील आणि चित्रकला विभागातील ८ प्राध्यापकहि उत्साहाने कार्यरत होते..


Ministry of Textiles
Government of India
Charni Road
Time : 11.00 am to 5.00
Service Centre
1800-208-4800


Ministry of Textiles
Government of India
CRAFT AWARENESS PROGRAMME
S.N.D.T. College, Mumbai
Charni Road, Mumbai
Service Centre
Website - www.handicrafts.nic


Ministry of Textiles
Government of India
AFT AWARENESS PROGRAMME
Co-ordination with S.N.D.T. College, Mumbai
ue : S.N.D.T. Karyashala, Charni Road, Mumbai


Ministry of Textiles
Government of India
CRAFT AWARENESS PROGRAMME
in Co-ordination with S.N.D.T. College, Mumbai
Venue : S.N.D.T. Karyashala, Charni Road, Mumbai
Office of the Development Commissioner (Handicrafts)
Handicrafts Service Centre


VACCINATION
ROOM





